DAY — 03 SEAT NUMBER

2017	III	02	1100	J - 509	(M)

MARATHI (02)

Time : 3 Hrs. (7 Pages) Max. Marks : 80

प्र. १. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर सुमारे ३०० शब्दांत निबंध लिहा : [१०]

(१) वृक्षवल्ली आम्हां सोयरी वनचरे

(२) वृत्तपत्रे बंद पडली तर ....

(३) मी पाहिलेला क्रिकेटचा सामना

(४) सर्कशीतील हत्तीचे मनोगत

प्र. २. (अ) खालील काव्यवेच्याचे रसग्रहण करा : (६) [१०]

'चाललो'

वाटेवर काटे वेचीत चाललो
वाटले जसा फुलाफुलांत चाललो
मिसळुन मेळ्यात कधी, एक हात धरुनि कधी
आपलीच साथ कधी करित चाललो.
आधिचा प्रसाद घेत, पुढची ऐकीत साद
नादातच शीळ वाजवीत चाललो
चुकली तालात चाल, लागला जिवास बोल
ढळलेला तोल सावरीत चाललो
खांद्यावर वाळगिले ओझे सुखदु:खांचे
फेकुन देऊन अता परत चाललो !

— अनिल

https://www.maharashtrastudy.com

किंवा

(अ) खालीलपैकी कोणत्याही <u>एका</u> विषयाशी निगडित सुमारे १५ ते २० ओळींत संवादलेखन करा :

(१) बारावीनंतर काय करावे, याबाबत मित्राशी संवाद.

(२) 'कचरा निर्मूलना'बाबत स्वच्छता विभाग अधिकाऱ्याशी संवाद.

(३) 'महाविद्यालयातील मुलींची सुरक्षितता' या विषयावर प्राचार्यांशी संवाद.

(ब) खालील प्रश्नांच्या उत्तरांचे योग्य पर्याय निवडून लिहा : (४)

(१) खालील नामासाठी योग्य विशेषण वापरा :

आकाश -

(अ) निळेशार (ब) मंदमंद

(क) हिरवेगार (ड) पिवळेधम्म

(२) खालील शब्दाला समानार्थी शब्द ओळखा :

घोडा -

(अ) अश्व (ब) गाडी

(क) वराह (ड) कूर्म

(३) गटात न बसणारा शब्द ओळखा :

(१) अनिल -

(अ) मरुत (ब) पवन

(क) गगन (ड) वायू

(२) -कार -

(अ) चित्रकार (ब) शिल्पकार

(क) गीतकार (ड) प्रकार

प्र. ३. खालील प्रश्नांच्या उत्तरांचे योग्य पर्याय ओळखून लिहा : **[१२]**

(अ) खालील पर्यायांतून निर्दोष शब्द ओळखा : (२)

(१) (य) कोट्याधीश (र) कोट्यधीश

(ल) कोट्यधीष (व) कोट्याधिश

https://www.maharashtrastudy.com

(२) (य) विसंगती (र) विसंगति

(ल) विसगंती (व) वीसंगती

(ब) खालील वाक्प्रचारांच्या अर्थाचा योग्य पर्याय ओळखा : (२)

(१) संभ्रमित होणे -

(य) गोंधळून जाणे (र) भ्रमिष्ट होणे

(ल) विचारात पडणे (व) अचंबित होणे

(२) साद घालणे -

(य) गोंगाट करणे (र) गप्प राहणे

(ल) चर्चा करणे (व) हाक मारणे

(क) (१) खालील वाक्याचे होकारार्थी रूपांतर ओळखा : (१)

वाक्य : मी जरासाही कोरडा राहिलो नव्हतो.

पर्याय :

(य) बापरे! मी पूर्णपणे ओला झालो होतो!

(र) मी पूर्णपणे ओला झालो होतो.

(ल) मी पूर्णपणे ओला झालो नव्हतो काय?

(२) खालील वाक्याचे प्रश्नार्थी रूपांतर ओळखा : (१)

वाक्य : आपण थांबलात तर कृपा होईल.

पर्याय :

(य) आपण कृपया जाऊ नये.

(र) छान! आपण थांबलात!

(ल) आपण कृपा करून थांबाल का?

(ड) खालील वाक्यांत कोणती विरामचिन्हे वापरता येतील त्याकरिता योग्य पर्याय निवडा : (२)

(१) **वाक्य :** सूनबाई या बाळराजांना आमची ही भेट

पर्याय :

(य) स्वल्पविराम, अर्धविराम (र) उद्‌गारचिन्ह, पूर्णविराम

(ल) उद्‌गारचिन्ह, अर्धविराम (व) स्वल्पविराम, दुहेरी अवतरण

https://www.maharashtrastudy.com

(२) **वाक्य :** ''छान आहेस हो बाय जेवशील काय आमच्या घरी''

पर्याय :

(य) अर्धविराम, पूर्णविराम (र) स्वल्पविराम, प्रश्नचिन्ह

(ल) उद्‌गारचिन्ह, प्रश्नचिन्ह (व) संयोगचिन्ह, पूर्णविराम

(इ) खालील विधानात / काव्यपंक्तीत कोणता रस प्रामुख्याने आढळतो, त्यासाठी योग्य पर्याय निवडा : (२)

(१) तुकाराम भीतीने गुरासारखा ओरडला. त्याचे सगळे रक्त उलथेपालथे झाले आणि एक किंकाळी फोडून तो विलक्षण वेगाने पळाला.

(य) हास्य रस (र) शांत रस

(ल) वीर रस (व) भयानक रस

(२) खदखदा हसू लागली झाडे। फुलांची मिष्किल झाली तोंडे!

(य) करुण रस (र) शांत रस

(ल) हास्य रस (व) बीभत्स रस

(फ) खालील पारिभाषिक शब्दांसाठी योग्य पर्याय निवडा : (२)

(१) Backlog -

(य) अनुशेष (र) राखीव

(ल) अनुदिनी (व) अनुभव

(२) Commissioner -

(य) अधीक्षक (र) प्रमुख

(ल) प्रबंधक (व) आयुक्त

प्र. ४. (अ) खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर सुमारे ८० शब्दांत लिहा : (४) **[७]**

(१) विनोदाचे फायदे कोणते?

(२) मानसीला कोणत्याही वातावरणात पेपर लिहिता यावा म्हणून तिच्या पालकांनी कोणकोणत्या हास्यास्पद गोष्टी केल्या?

(३) 'चांफा' या विडंबन कवितेतून समाजातील कोणती मानवी प्रवृत्ती दिसून येते?

https://www.maharashtrastudy.com

(ब) खालीलपैकी कोणत्याही तीन प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी फक्त 'एका' वाक्यात लिहा : (३)

(१) सोनाराने भुताला हुसकावून लावण्यासाठी काय केले?

(२) अमावास्येच्या रात्री तुकाराम कुठे चालला होता?

(३) रव्या व रश्मी कोणत्या वृत्तीचे आहेत?

(४) 'चाफा' ही विडंबन कविता कोणत्या काव्यसंग्रहातून घेतली आहे?

(५) सामान्यपणे विनोदाचे कोणते प्रकार मानले जातात?

प्र. ५. (अ) खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी सुमारे ८० शब्दांत लिहा : (८) [१२]

(१) 'मुंबई म्हणजे साक्षात कल्पवृक्ष' असे लेखक रवींद्र पिंगे का म्हणतात?

(२) डॉ. कलामांनी लता मंगेशकर यांची कोणती आठवण सांगितली?

(३) लेखिका गिरिजा कीर यांना हिराच्या घरात कोणते वेगळेपण जाणवले?

(४) उन्नीकृष्णन यांचे आभार मानायला हवेत, असे लेखक अविनाश हळबे यांना का वाटले?

(ब) खालीलपैकी कोणत्याही चार प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी फक्त 'एका' वाक्यात लिहा : (४)

(१) गुजरात हद्दीवरचे कोणते गाव लेखकाचे नंदनवन आहे?

(२) डॉ. कलाम यांच्या मते बालपणी आपण कोणाला आदर्श मानतो?

(३) मुरुडला असताना लेखिकेची कोणाशी जवळीक झाली?

(४) ले. कर्नल श्याम चव्हाण यांच्या मनात आत्महत्येचा विचार का आला?

(५) 'अतिकाळजीने परिणाम' या पाठाच्या लेखकाचे नाव लिहा.

(६) उन्नीकृष्णन यांनी हारा कसा उचलला?

प्र. ६. (अ) खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी सुमारे ८० शब्दांत लिहा : (८) [११]

(१) संत जनाबाई यांनी पारमार्थिक सुखासाठी परमेश्वरी कृपेची आवश्यकता कशाप्रकारे विशद केली आहे?

(२) 'सर्वांना सुखी करण्यात आपलेही सुख सामावलेले असते' हे महात्मा फुले यांनी कसे पटवून दिले आहे?

https://www.maharashtrastudy.com

(३) कुसुमाग्रजांनी देशबांधवांना कोणते आवाहन केले आहे?

(४) फ. मुं. शिंदे यांच्या कवितेतून दुष्काळाचे वर्णन कसे आले आहे?

(ब) खालीलपैकी कोणत्याही तीन प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी फक्त 'एका' वाक्यात लिहा : (३)

(१) प्रापंचिकाने परस्त्रीकडे कोणत्या दृष्टीने पाहावे असे संत नामदेवांना वाटते?

(२) संत शेख महंमद कोणत्या संप्रदायातील महत्त्वाचे कवी आहेत?

(३) महात्मा फुले यांच्या मते आपले आचरण कसे असावे?

(४) स्त्रीला लग्नात काय आंदण मिळते?

(५) 'नव्या शहराविषयी' या कवितेचे कवी कोण आहेत?

प्र. ७. (अ) खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी सुमारे ८० शब्दांत लिहा : (८) [१८]

(१) अग्रलेखाचे स्वरूप कसे असते?

(२) उद्घोषणेचे महत्त्व स्पष्ट करा.

(३) दूरचित्रवाणीवरील सूत्रसंचालकाच्या अंगी कोणकोणते गुण असावेत?

(४) सामाजिक संपर्कासाठीच्या संकेतस्थळांचे फायदे कोणते आहेत?

(ब) खालीलपैकी कोणत्याही सहा प्रश्नांची उत्तरं प्रत्येकी फक्त 'एका' वाक्यात लिहा :(६)

(१) आकाशवाणीवरील बातमीपत्राचा कालावधी किती मिनिटांचा असतो?

(२) 'क्यूशीट' म्हणजे काय? https://www.maharashtrastudy.com

(३) आकाशवाणी या माध्यमाचा शोध कोणी लावला?

(४) कोणत्या संस्थानाने रेडिओ केंद्रास 'आकाशवाणी' हे नाव दिले?

(५) दूरदर्शनचे 'ब्रीदवाक्य' कोणते ते लिहा.

(६) भारतात दूरचित्रवाणीचा पहिला प्रक्षेपक कोणी बनविला?

(७) कोणत्या कलेस पासष्टावी कला मानली जाते?

(८) भारतात स्टार टी. व्ही. कोणत्या साली दिसू लागला?

(९) सरकारी दूरचित्रवाणीचे नाव काय आहे?

https://www.maharashtrastudy.com

(क) खालीलपैकी कोणत्याही <u>एका</u> विषयावर मुलाखतपूर्व तयारी म्हणून ६ ते ८ प्रश्नांची प्रश्नावली तयार करा : (४)

(१) बोर्डाच्या बारावीच्या परीक्षेत राज्यात प्रथम आलेल्या विद्यार्थ्याची मुलाखत.

(२) सुशिक्षित बेरोजगार तरुणाची मुलाखत.

(३) भाजीविक्रेत्या स्त्रीची मुलाखत.

◆◆◆

https://www.maharashtrastudy.com
Whatsapp @ 9300930012
Send your old paper & get 10/-
अपने पुराने पेपर्स भेजे और 10 रुपये पायें,
Paytm or Google Pay से

https://www.maharashtrastudy.com